# प्रेस नोट

| | | |
|---|---|---|
| 1 | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नांदेड |
| 2 | पोलीस स्टेशन | पोस्टे देगलुर |
| 3 | गुरनं व कलम | गुरनं ५३२/२०२५ कलम कलम ७ भ्रप्रअ १९८८ |
| 4 | तक्रारदार | पुरूष, वय 49 वर्षे |
| 5 | आरोपी लोकसेवक | वामन शेषराव बिरादार, वय  52 वर्षे, पद ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक, ग्रामपंचायत– भायेगाव, देगाव, पंचायत समिती देगलूर ता. देगलूर, जि.नांदेड. (गट क) |
| 6 | गुन्हा घडला तारीख व वेळ व ठिकाण | दिनांक १९/११/२०२५ रोजी चे ११.४५ ते १४.१२ वाजताचे दरम्याण पंचायत समिती देगलुर चे परीसरात |
| 7 | गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक १९/११/२०२५ रोजी २१.११ वाजता |
| 8 | मागणी केलेली रक्कम | ५,०००/– रूपये |
| 9 | स्विकारलेली रक्कम | ४,०००/– रूपये |
| 10 | **थोडक्यात माहिती** – दिनांक १७/११/२०२५ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली कि, तक्रारदार यांचे चुलत्याचे नावे घरकुल मंजूर झालेले असून दिनांक ०३/०९/२०२५ रोजी घरकुलाचा पहिला हफ्ता  १५,०००/– रूपये त्यांना मिळालेला आहे. साधारण १५ दिवासापुर्वी तक्रारदार यांचे चुलते हे ग्रामविकास अधिकारी वामन बिरादार यांना भेटले व घरकुलाचा पुढील हफ्ता मिळणे करीता त्यांना विनंती केली. तेव्हा लोकसेवक वामन बिरादार यांनी घरकुलाच्या ठिकाणी स्थळ पाहणी पंचनामा करण्यासाठी ५०००/– रुपयांची मागणी केली. त्यानंतर दिनांक १३/११/२०२५ रोजी तक्रारदार यांच्या चुलत्याचे  घरकुलाचा पुढील हफ्ता मिळणे करीता तक्रारदार यांनी लोकसेवक वामन बिरादार यांची पंचायत समिती देगलूर येथे भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक वामन बिरादार यांनी तक्रारदार यांना, तुमच्या चुलत्याच्या घरकुलाचा पुढील हफ्ता मिळण्यासाठी सदर ठिकाणी हजर राहून पंचनामा करून पुढील हफ्ता मिळण्याची शिफारस करावी लागेल. त्यासाठी मला ५०००/– रूपये द्यावे लागतील असे म्हणून तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली.<br>दिनांक १९/११/२०२५ रोजी पंचायत समिती देगलूर आवारात लोकसेवक वामन बिरादार यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे काकाचे घरकुलाचा पुढील हफ्ता मिळवून देण्यासाठी पंचनामा करून शिफारस करण्यासाठी शासकीय पंचासमक्ष ५,०००/– रूपये लाचेची स्वतः मागणी करून तडजोडी अंती ४,०००/– रूपये स्वीकारण्यास सहमती दिल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.<br>दिनांक १९/११/२०२५ रोजी आरोपी लोकसेवक यांनी पंचायत समिती देगलूर येथील जिल्हा परिषद पाणी पुरवठा उप–विभाग, देगलूर कार्यालय येथे तक्रारदार यांचेकडून शासकीय पंचासमक्ष ४,०००/– रूपये लाच रक्कम स्वतः स्विकारली आहे. म्हणुन पोस्टे देगलुर गुरनं ५३२/२०२५ कलम कलम ७ भ्रप्रअ १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. | |

सदरची अपसंपदा कारवाई मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांच्या मार्गदर्शनानुसार ला.प्र.वि. नांदेडचे पोलीस उप अधीक्षक प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक राहुल तरकसे, पोलीस निरीक्षक श्री. करीम खान पठाण, श्री. रसुल तांबोळी, पोहेकॉ/अरशद खान यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील कमांकावर संपर्क करावा.

**१) संदीप पालवे, पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११, मो.नं. ९२२६४८४६९९
**२) श्री अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक** – ०२४६२ – २५५८११
**३) श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक** – मो.नं. ९३५९०५६८४०.
**४) टोल फ्रि** – १०६४
**५) ला.प्र.वि. नांदेड दुरध्वनी कमांक** – ०२४६२ – २५३५१२
**६) Website** – www.acbmaharashtra.gov.in
**७) Mobile App** – www.acbmaharashtra.net
**८) Facebook Page** – www.facebook.com/maharashtraACB
**९) Twitter** – @ACBnanded
**१०) Instagram** – acb_nanded
**११) Youtube Cahnnel** – @AntiCorruptionBureauNanded

कार्यालय,पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग,नांदेड परिक्षेत्र

**पोलीस उपअधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड**